# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


क्रमांक- एनएसपी पोर्टल-२०२१-२२/(८३/२२)/शिष्यवृत्ती/६३ दिनांक : १०.०१.२०२२

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

**विषय : - सन २०२१-२२ साठी केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांच्या मुदतवाढीबाबत.**

**संदर्भ : -** मा. शिक्षण संचालनालयाचे ईमेलद्वारे प्राप्त पत्र क्र. उशिसं/शिष्य/केंद्रपुरस्कृत २०२१-२२/१३११९ दि ०१.०१.२०२२.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत केंद्र पुरस्कृत शिष्यवृत्तीची www.scholarships.gov.in या संकेतस्थळावरुन १. केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती, २. महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर स्कॉलरशिप ३. दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना या योजना राबविल्या जातात. या तीन योजनांची उच्च शिक्षण संचालनालयामार्फत अंमलबजावणी करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या प्राप्त सूचनानुसार सन २०२१-२२ साठी केंद्र पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणीबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

**सदर शिष्यवृत्तींसाठी विद्यार्थ्यांनी अर्ज करण्यासाठी केंद्र शासनाकडून दि. १५.०१.२०२२ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे.**

सदर शिष्यवृत्तीचे एन.एस.पी. पोर्टलवरील विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांनी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची तपासणी करुन अर्जावर विनाविलंब कार्यवाही करणे आवश्यक आहे.

केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक योजनेपासून एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबतची माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्या त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठामधील विद्यार्थ्यांबाबत संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव यांची राहील. याची सर्व महाविद्यालय / संस्था / विद्यापीठांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रति - १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांना माहितीसाठी सादर.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. प्राचार्य, तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्था.
८. प्राचार्य, वैद्यकिय महाविद्यालये.
९. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे १.
१०. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, नाशिक.